# प्रेसनोट

जा.क्र. ६३१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—०१/१०/२०१६

## " प्राणी संरक्षण अधिनियम"कार्यशाळा

**भंडारा**: पोलीस मुख्यालय येथील मिटींग हॉलमध्ये ३० सप्टेंबर २०१६ रोजी मा. पोलीस अधीक्षक विनीता साहु मॅडम तसेच प्रमुख वक्ते सुकांत निर्माण चॅरीटेबल ट्रस्टचे अध्यक्ष कनुभाई सावळीया व डॉ. शाम काळे (टेक्नीकल ॲडवायजर) यांच्या मार्गदर्शनाखाली "प्राणी संरक्षण अधिनियम" या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. सदर कार्यशाळेत महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ व प्राणी संरक्षण अधिनियम १९६० यावर कार्यशाळा घेण्यात आली. या कायदया मध्ये झालेल्या नवीन सुधारणा याबाबत पोलीस अधिकारी व कर्मचा—यांना मार्गदर्शन करण्यात आले.

भंडारा जिल्हयामध्ये अवैध्यरित्या प्राण्यांची वाहतुक होत असुन सदर वाहतुकीवर पोलीसांन मार्फत एकुण ३८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच प्राणी सुरक्षेसाठी गौरक्षण आणि पांजरपोळा (कोंडवाडा) येथे ठेवण्यात येतात. त्यामध्ये असे आढळुन येते कि काही गौरक्षण संस्था व काही खाजगी दल हे स्वत:हुन अवैध्यरित्या प्राण्यांची वाहतुक होत असणा—या वाहणांना बेकायदेशीर रित्या अडवणुक करून वाहनांची तोड—फोड व जाळपोळ करीत असतात. त्यांना अशा प्रकारे वाहने अडविण्याचा व वाहने चेक करण्याचा अधीकार गौरक्षण संस्था व खाजगी दल यांना नाही. या लोकांनी वाहने अडवल्यास त्यांच्यावर कायदेशीर गुन्हे दाखल करण्याबाबत तसेच अवैध रित्या प्राण्याची वाहतुक करणा—या वाहन चालक व मालकावर महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधी.—१९७६, प्राण्यांना निर्देतेने वागविण्याचा अधिनियम १९६० अन्वये कार्यवाही करावी असे मा. पोलीस अधीक्षक विनिता साहू यांनी ठाणेदारांना निर्देश दिले आहे.

तसेच पो.नि. गाडे यांनी ध्वनी प्रदुषण कायदयाची अमलबजावणी करित असतांना कशा प्रकारे कार्यवाही करावी व कायदयाची अमजबजावणी करावी याबाबत मार्गदर्शन केले. ध्वनी आवाजाची मर्यादा पाळुन पालन करुन मा. पोलीस अधिक्षक भंडारा यांनी डी. जे. मुक्त नवरात्र उत्सव साजरा करण्याबाबत सर्व नवरात्र उत्सव मंडळांना आवाहन केले आहे.

सदर कार्यक्रमात प्रमुख वक्ते सुकांत निर्माण चॅरीटेबल ट्रस्टचे अध्यक्ष कनुभाई सावळीया व डॉ. शाम काळे यांनी कार्यक्रमामध्ये कायदयातील नवीन सुधारणा व कलमावर मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाला एकुण ५० अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्राति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.